RETAILERS ASSOCIATION OF INDIA

**Clarification received from the State Government of Maharashtra regarding the 24/7 Store Opening permission in the State.**

---

**महाराष्ट्र शासन**

क्रमांक: बैठक-०४/२०१८/प्र.क्र.५९/काम-१०
उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दि. ०४/०५/२०१८.

प्रति,
श्री गौतम जैन,
संचालक,
रिटेलर्स असोसिएशन ऑफ इंडिया,
१११/११२, एस्कॉट सेंटर, आय.टी.सी मराठा हॉटेल जवळ,
सहार रोड, सहार अंधेरी (पूर्व), मुंबई -४०००९९

विषय:- Clarification required regarding 24/7 operation of retail shops and establishments in Maharashtra State.(Retailers Association of India)

महोदय,

वरील विषयावरील आपल्या दि.२७/०३/२०१८ च्या पत्राच्या अनुषंगाने असे कळविण्यात येते की, महाराष्ट्र दुकाने व आस्थापना (नोकरीचे व सेवाशर्तीचे विनियमन) अधिनियम, २०१७, हा राज्यात दि.१९/१२/२०१७ पासून लागू झाला आहे. उक्त अधिनियमातील तरतुदीनुसार मालकाच्या स्वेच्छानिर्णयानुसार एकापेक्षा अधिक पाळ्यांमध्ये (Shifts) आस्थापना सुरु ठेवण्याची मुभा आहे. उक्त अधिनियमातील कलम ११ च्या संदर्भात या आस्थापनांना अधिनियमातील तरतुदींचे पालन करण्याच्या अधीन राहून एकापेक्षा अधिक पाळ्यांमध्ये म्हणजेच २४ तास दुकाने व आस्थापना चालू ठेवण्याची मुभा आहे. मात्र या संदर्भात पोलिस विभाग व स्थानिक प्राधिकरणे यांचेकडील बंधने त्या त्या संबंधित अधिनियमांनुसार स्वतंत्रपणे लागू राहतील.

आपली,

(शरयू मोरे)
कक्ष अधिकारी
उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग

F:\SIDDHI\letter_commissioner_2018 .doc